“स्वावलंबी शिक्षण हेच आमचे-ब्रीद” -कर्मवीर

# रयत शिक्षण संस्थेचे,
# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

## मराठी विभाग २०२२-२३

## परिमल भित्तीपत्रक अंक –पहिला

# स्वातंत्र्य दिनानिमित्त विशेषांक



उद्घाटन : सोमवार दिनांक १५ ऑगस्ट २०२२

ये महोत्सव है देश के लिए, त्याग और बलिदान का I

ये महोत्सव है मातृभूमि के, गौरव और स्वाभिमान का II

## संपादक मंडळ

चि. अमर कस्तुरे B.A-II

चि. ऋतिक कांबळे B.A-II

चि. आदित्य कांबळे B.A-II

चि. प्रतिक पाटील B.A-II

कु. गायत्री बुरुड B.A-II

कु. ऋतुजा कांबळे B.A-II

कु. शुभांगी पाटील B.A-II

कु. अबोली हेडगे B.A-II

## मार्गदर्शक

**डॉ.महेश रणदिवे**
(सहा.प्राध्यापक, मराठी विभाग)

**श्री.अंकुश घुले**
(सहा.प्राध्यापक, मराठी विभाग)

**प्रो.डॉ.सिंधू आवळे**
(प्रमुख , मराठी विभाग)

**प्रो.डॉ.भाग्यश्री पुणतांबेकर**
(प्रमुख , कला शाखा )

**डॉ. किशोर गायकवाड**
(उपप्राचार्य)

**प्रो.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार**
प्राचार्य

## संपादकीय :

७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त 'परिमल' भित्तीपत्रक अंकाचे प्रकाशन करताना आम्हाला अत्यंत आंनद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२२ – २३ मधील हा पहिलाच परिमलचा अंक आम्ही प्रकाशित करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला. म्हणून १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिवस म्हणून सर्वत्र आनंदाने साजरा केला जातो. स्वातंत्र्य दिनादिवशी शाळा, कॉलेजेस, सरकारी, निमसरकारी कार्यालयातून ध्वजारोहण केले जाते. मान्यवर व्यक्ती, निवृत्त अधिकारी, जेष्ठ नागरिक, नेते मंडळी यांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. हा दिवस देशभर मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जातो. चालू वर्ष आपण सर्वजण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. हे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना आपणाला भविष्यातील आपल्या देशाची वाटचाल कशी असावी याविषयी विचार मंथन करावे लागणार आहे. आपल्या देशाचे रक्षण व्हावे यासाठी आपले सैनिक बांधव रात्रंदिवस कष्ट करीत आहेत. आज आपल्या देशामध्ये अनेक चांगल्या घटना घडत आहेत. आपले खेळाडू आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करीत आहेत. याचबरोबर आपल्या देशातील शास्त्रज्ञ संशोधांच्या क्षेत्रात प्रगती करीत आहेत. शेती व शेतकरी हा आपल्या देशाचा अविभाज्य भाग आहे. आपल्या देशाच्या विकासात वरील सर्व घटकाचे योगदान महत्त्वपूर्ण स्वरूपाचे राहिलेले आहे. गेल्या दोन वर्षाचा काळ हा आपल्यासाठी कठीण स्वरूपाचा होता. करोना महामारीने आपल्या देशाची अर्थव्यवस्था बिकट अवस्थेत आहे. अशा ही परस्थित आपले देशबांधव देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या अमृत महोत्सवी वर्षात आपला देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. याचा भारतीय नागरिक म्हणून आपल्या सर्वाना सार्थ अभिमान आहे. प्रस्तुतचा अंक हा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून प्रकशित होत असल्याने यामधील लेख, कविता, निबंध, चारोळी, छायाचित्रे ही देश भक्तीपर आहेत. या अंकातील सर्व साहित्य आम्ही विद्यार्थ्यांनी संग्रहित केलेले आहे. यासाठी आम्हाला मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे, प्रा.अंकुश घुले, डॉ.महेश रणदिवे यांचे उत्तम मार्गदर्शन मिळाले. प्रस्तुत अंकातील लेखन साहित्य हे Google वरून संग्रहित केलेले आहे. यातील लेखन साहित्यावर संपादक मंडळातील सदस्य सहभागी असतीलच असे नाही.

जय हिंद I

# स्वातंत्र्य दिन :

**स्वातंत्र्य दिन** (१५ ऑगस्ट) हा भारताचा विशेष महत्त्वाचा दिवस आहे.ब्रिटिश साम्राज्यापासून दिनांक १५ ऑगस्ट इ.स. १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे भारताचा स्वातंत्र्य दिन दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा भारतातील एक राष्ट्रीय सण आहे. या दिवशी दिल्लीतील लाल किल्ल्यावर भारताचा राष्ट्रध्वज फडकवला जातो. देशभरातही बहुतांश ठिकाणी ध्वजारोहण, मिरवणुका व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे हा दिवस साजरा केला जातो. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात योगदान असलेल्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे कृतज्ञतापूर्वक स्मरण या दिवशी केले जाते. इ.स. १७७० पासून भारतावर इंग्रजांचे राज्य होते. १९व्या शतकापासूनच सर्व राज्यांना इंग्रजांनी आपल्या सैन्यबळावर ताब्यात ठेवले होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटिशांनी त्यांची व्यवस्था अजूनच शिस्तीची केली. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांना लक्षात आले की, आपल्याला भारतावरचे राज्य व युद्ध हे सांभाळता येणार नाही आहे. तसेच दुसऱ्या बाजूला भारतीय क्रांतिकारकांचा जोर वाढत होता. ही गोष्ट कळल्यानंतर ब्रिटनच्या पंतप्रधानांनी जून १९४७ पर्यंत भारत पूर्णपणे स्वतंत्र करण्याची हमी दिली. अखेर दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पण त्यावेळी भारताचे पाकिस्तान आणि भारत असे दोन तुकडेही पडले.[५] पाकिस्तानी भागात राहणाऱ्या अनेक पंजाब्यांना व सिंधीना त्यांचे घरदार, पैसा सोडून यावे लागले. अनेक लोक ह्यामध्ये मारलेही गेले. पुढे ह्या विभाजनामुळे काश्मीरचा प्रश्नही पुढे आला. स्वतंत्र भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक झाला. भारताची राज्यघटना तयार करण्यात बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा मोलाचा वाटा होता. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. रवींद्रनाथ टागोर ह्यांनी लिहिलेले जन गण मन हे भारताचे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय ह्यांनी लिहिलेले वन्दे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले. भारतात सर्व ठिकाणी स्वातंत्र्य दिनाची सार्वजनिक सुट्टी दिली जाते. सर्व शाळा, महाविद्यालये-कार्यालयांमध्ये ध्वजारोहण व ध्वजवंदन असते. भारताचे पंतप्रधान हे दरवर्षी भाषण देतात. या दिवशी लाल किल्ला येथे भारताचे पंतप्रधान ध्वजारोहण करतात. त्यादिवशी बहुतांश रेडिओ केंद्रावर तसेच दूरदर्शनवर देशभक्तिपर गाणी, कार्यक्रम, चित्रपट लागतात. **१५ ऑगस्ट १९४७** हा भारताचा स्वातंत्र्यदिन आहे. ब्रिटिश सत्तेपासून या दिवशी मध्यरात्री १२ वाजता भारताला स्वातंत्र्य मिळाले, म्हणून या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व आहे.

आज़ादी का अमृत महोत्सव

**स्वतंत्र दिन कविता :**

*किती आक्रोश तो झाला*
*किती रक्तांच्या नद्या वाहल्या*
*सडा पडला म्रुतदेहांचा*
*तेव्हा स्वातंत्र्यदिन उदयास आला*

*तरुणान्नि तरुणपन दिले*
*इच्छा आकांशांवर पाणी सोडले*
*मात्रुभुमिलाच प्रेयसी मानले*
*अन तिच्या रक्षनार्थ विरमरण पत्करले*
*तेव्हा स्वातंत्र्य उदयास आले*

*आइने मुलाचे दान दिले*
*विवहितेने सौभाग्य पनाला लावले*
*तरुणिन्निही शस्त्र धारण केले*
*देशलाच आपला दागिना मानले*
*तेव्हा स्वातंत्र्य उदयास आले.*
*स्वतंत्र दिनाच्या शुभेच्छा I*

**जय हिंद** **जय भारत**

## स्वातंत्र्याचा सोहळा कविता :

स्वातंत्र्याचा सोहळा जरी
झाला आता जुना
आज माझ्या मनी जागली
देशभक्तीची भावना

सणांचे रूप आले होते
साऱ्या त्या शाळांना
ऐकत होते चिमुरडे सारे
कौतुकाने त्या भाषणांना

देशभक्तीची जाण भारी
छोट्या त्या चिमुकल्यांना
मी ही भरला आवाज
अन् साथ दिली घोषणांना

आज माझ्या मनी जागली
देशभक्तीची भावना
आज चाळलं मनाने
इतिहासाच्या पानांना
नव्याने आठवलं मी
त्या महान बलिदानांना

शौर्याच्या कथा साऱ्या
दिसू लागल्या डोळ्यांना
पुन्हा जाणवल्या लढ्याच्या
त्या साऱ्या खूणा

आज माझ्या मनी जागली
देशभक्तीची भावना
आज पुन्हा गुणगुणली
देशप्रेमाची गाणी
आठवली आज मला
क्रांतीची ती कहाणी

आज़ादी का अमृत महोत्सव

झेंड्याला वंदन करून
गर्व झाला श्वासांना
छातीत भरून घेतलं मी
देशभक्तीच्या साऱ्या भावनांना

# भारतीय स्वातंत्र्य :

स्वातंत्र्य दिवस हा प्रामुख्याने संबधित देशाच्या राजकीय स्वातंत्र्य दिवसास संबोधले जाते. भारताचा स्वातंत्र्य दिवस ऑगस्ट 15, 1947 हा आहे. 15 ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिवस म्हणून दर वर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. प्रमुख कार्यक्रम ,नवी दिल्ली येथे लाल किल्याच्या साक्षीने साजरा केला जातो.पेशवाईच्या अस्ताबरोबर मराठ्यांची मर्दुमकी संपली आणि कधीच ना मावळण्याची इंग्रजांचा सूर्य उगवला. जोपर्यंत या सूर्याची प्रखरता जनमानसाला जाणवत नव्हती, तोपर्यंत इंग्रज लोक आपल्या मर्जीप्रमाणे वागले. इंग्रजरूपी सूर्य जेव्हा डोक्यावर आला, तेव्हा त्याचा प्रखर किरणांनी हिंदुस्थानी जनता हैराण झाली. पारतंत्र्यात गेल्यानंतर त्यातून सुटका होणे कठीण असते. इंग्रजांच्या सैन्याशी लढणे कठीण काम होते. परंतु लोकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. हिंदुस्थानी लोकांनी इंग्रजांविरुद्ध इ.स. १८५७ साली प्रथम बंड केले पण त्यांना यश मिळाले नाही.

सन १७७८ मध्ये देशी छापखान्यांचा कायदा व हत्यारबंदीचा कायदा करण्यात आला. त्यामुळे हिंदुस्थानी लोकांच्या वर्तमानपत्रावर नियंत्रण आले व दुसऱ्या कायद्याने हिंदी लोकांना निःशस्त्र करण्यात आले. हिंदी लोकांना व इंग्रजांना दिल्या जाणाऱ्या न्यायातही भेदभाव नजरेस येऊ लागला आणि हिंदी लोकांचे पुन्हा डोळे उघडले आणि संघटनेशिवाय सर्व व्यर्थ आहे, हे कळून चुकले. म्हणून हिंदी लोकांच्या सामाजिक, राजकीय, नैतिक व मानसिक उन्नतीसाठी संस्था स्थापन करण्याचा विचार पुढे आला. त्यातून 'इंडियन नॅशनल काँग्रेस 'ची स्थापना केली गेली. काँग्रेस आपल्या अधिवेशनात हत्यारबंदीच्या कायद्यात फेरफार, लष्करी खर्चात कपात, सनदी नोकऱ्यांचे हिंदीकरण, हिंदुस्थानातील उद्योगधंद्यांना उत्तेजन, समान वर्तन, अशा तऱ्हेचे ठराव करून सरकारकडे पाठवत. परंतु या प्रश्नांची उपेक्षा होई. लोक चिडून जात असत. त्या वेळी भारतीय जनतेला टिळकरूपाने पुढारी मिळाला. ते जहाल व राष्ट्रवादी होते. त्यांनी आपल्या 'केसरी ' वर्तमानपत्रातून लोकांमध्ये स्वावलंबन व स्वदेशीचे प्रेम आणि राष्ट्रीय जागृती उत्पन्न करण्याचे महान प्रयत्न केले.

15 ऑगस्ट 1947 या दिवशी, भारत ब्रिटीशांच्या जोखड्यापासून स्वतंत्र झाला. प्रतिवर्ष, १५ ऑगस्ट हा दिवस भारताचा स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्यात येतो. हे राष्ट्रीय पर्व संपूर्ण देशभरात अमाप उत्साहात साजरा केले जाते.१९२० ला टिळकांचे निधन झाले. सारा देश ओक्सबोक्शी रडला. आता लोक निवळतील, अशी इंग्रजांना खात्री वाटू लागली. परंतु घडायचे वेगळेच होते. महात्मा गांधी आफ्रिकेतून भारतात आले आणि स्वातंत्र्य-संग्रामात उतरले. सत्याग्रह, असहकार व हातात शस्त्र न घेता प्रतिकार या त्रिसूत्रीची योजना ठरवून, अंमलात आणली. सतत झगडून इंग्रजांना हैराण केले. याच काळात क्रांतिकारक पक्षही काम करीत होते. काँग्रेसचे व क्रांतिकारकांचे ध्येय एकाच होते, परंतु मार्ग भिन्न होते. ८ ऑगस्ट १९४२ साली काँग्रेसच्या अखिल भारतीय समितीने 'भारत छोडो'ची घोषणा दिली आणि अहिंसात्मक लढा सुरु केला. सारा देश पेटून उठला. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यावाचून पर्यायच उरला नाही. १५ ऑगस्ट १९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. पारतंत्र्याची बेडी तुटली.

कोणत्याही देशासाठी स्वातंत्र्यदिन म्हणजे एक अभिमानाचा आणि गौरवाचा दिवस असतो. या विशेष पर्वणीला, जुलमी ब्रिटिश राजवटीच्या पंज्यापासून मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या आणि आयुष्य वेचणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली वाहिली जाते. सर्वप्रथम व्यापारासाठी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी टप्प्याटप्प्याने संपूर्ण भारताचे शासन काबीज केले.१५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीच्या ठोक्यावर भारताने ब्रिटिश राजवटीच्या शृंखला तोडून स्वातंत्र्य मिळवले. ती सबंध देशभरासाठी उत्सवाची रात्र ठरली.१५ ऑगस्ट म्हणजेच भारताने स्वातंत्र्य मिळवलेल्या दिवशी देशभर ध्वजारोहण आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम ठेवून स्वातंत्र्यदिन साजरे केले जातात. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर प्रमुख कार्यक्रम असतो. तेथे पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण होते आणि तोफांनी ध्वजाला सलामी दिली जाते.

असा हा स्वतंत्रच लढा १८५७ पासून सुरु झाला होता. त्याला आज यश आले होते. शेकडो वर्षे गुलामगिरीच्या जोखडात अडकून पडलेला हिंदुस्थान स्वतंत्र झाला. गांधीजींनी असहकाराच्याद्वारे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देऊन एक जागतिक विक्रमच केला. या स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचा वाटा पण फार मोठा होता. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, मदनलाल धिंग्रा, चाफेकर बंधू, स्वा. सावरकर अशा अनेक क्रांतिकारकांनीसुद्धा इंग्रजांना सळो कि पळो करून सोडले. 'पिचेल मनगट परी, उरतील अभंग आवेश ' या आवेशाने लढले, झुंजले. अनेकांना बलिदान करावे लागले. तेही 'आज आमची सरणावरती पेटताच प्रेते, त्या ज्वाळातून उठतील भावी क्रांतीचे नेते' ह्याच विश्वासाने. त्यांनी ज्या स्वप्नासाठी बलिदान केले, त्याग केला, ती स्वप्ने या आपण साकार करूया. दास्यशृंखलांनी बद्ध झालेल्या देशाला त्या वेळी तरुणांनी मुक्त केले. आजही विषमतेची शृंखला दूर करून, आपण आपला देश बलशाली करूया.

## चारोळी :



## आजादी का अमृत महोत्सव :

१५० वर्षांच्या गुलामी नंतर तिरंगा मानाने सजला संपूर्ण भारत आज नटला ।
महागड्या आजादी चा महान इतिहास आज दिसला ॥
सोन्याची सूरी असणाऱ्या भारत देशात ब्रिटिशांनी सत्ता गाजवली।
आपल्याच देशात आपल्या लोकांवर त्यांनी तलवार नाचवली ॥
कुटुंबाचा विचार न करता मावळ्यांनी संपूर्ण देशाच्या स्वातंत्र्याचे पाहिले।
हया आजादी पाई भारत भूमित असंख्य रक्ताचे पाठ वाहिले ||
भारत देशाच्या जवानांनी जीवाचीपर्वा न केली।
अन आपली भूमिका चोख बजावली ||
वेळ प्रसंगी स्त्रियांनी ही जीवाची बाजी लावली।
दुश्मनावर तलवार नाचवली चालवली।।
जिजाऊ ने शिवबाला स्वातंत्र्यासाठी घडविले।
तर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव अशा तरूणांनी तरूणपण गमावले ॥
देशासाठी वीरांनी वीरमरण पत्कारले।
तेव्हा कुठे आपणास हे स्वातंत्र्य प्राप्त झाले ||

---

## स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा :

**भारत आहे माझा देश। इथे आहेत विविध वेशा**
**माझा भारत आहे सर्व गुण संपन्ना इथे जो कोणी येईल त्याला वाटते प्रसन्न।।**
**भारतात आहेत वेगवेगळे पक्षी ।जणू पृथ्वीवरील नक्षी**
**माझ्या देशात आहे खूप सणा भारताय आहे शांत मन ॥**
**माझा देश आहे खरा, निरनिराळ्या आहेत इथे परंपरा ।।**
**साऱ्या जगात आहे भारत श्रेष्ठा त्यापैकी एक आहे महाराष्ट्र ।**
**अशी कोणतीच गोष्ट नाही जी भारताया जमणार नाही। म्हणूनच म्हणते जो कोणी इथे येणं पाही तो इथेच रमून जाई।।**
**सर्व देश आहेत भारतासमोर लहान माझा भारत आहे खूप खूप महान।।**
**माझ्या देशात आहेत स्त्री-पुरुष समान। सगळेजण सदैव देयला तयार आहे हया देशासाठी प्राण ||**
**तिरंगा आमचा कधीच नाही झुकणार ।। घ्याला पाडण्याचा प्रयत्न करी तीच नेहमी दुकणार**
**जो सर्व जाती धर्माचे लोक इथे राहतात. परंतु देशासाठीच जगतात**
**खूप महान नेते माझ्या देवगाया लाभल नेहमी ज्या देशासाठीच राबले ।**
**भारताया दुश्मन आहे पाकिस्तान अशा घ्या भारतालाच म्हणतात हिंदुस्तान।।**
**भारत मातेला सलाम करते मी. कि आम्हा सर्वांची तू ताई आणि तुच आई।।**

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव :

**"एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार,**
**गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार!"**

कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास 15 ऑगस्ट 1947 चा दिवस उजाडला पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्या बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता-बघता स्वातंत्र्याचा प्रवास 75 वर्षांचा होता आहे.. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात 75 वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची 75 वर्ष पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या, ? आज सत्य "काय आहे? कुठे होती आपण आणि आता कुठे आहोत ? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील ? याचा विचार आपल्याला करायला लागेल. स्वातं त्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं ? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचली आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज समृद्ध देश आहे. माथी हिमालय उभा आहे. पायी सागराच्या लाटा लोळण घाळत आहेत. देशातून गंगा-गोदावरी, ब्रह्मपुत्रा सारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. निजीत पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्या त तेल घालून देशाची सीमा रक्षण करत आहेत. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलु, मनाली, उटी सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारत "देश" सुजलाम सुफलाम आहे. आपल्या देशाला पैराणिक आणि ऐतिहा - सिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्माचे, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची समी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केळी आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली 15 वर्ष साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आप ल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल की- भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खूप काही दिले आहे. परंतु जी असमाधानाचा, असंतोषाचा सूर निघत आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली.. पण पण मूल्यांचा -हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत. परंतु त्याच वेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय, अशी अवस्था झाली आहे. म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षानिमित देशातील जनतेला एवढेच आव्हान करतो.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कविता :

देऊनिया आहुती प्राणांची,
वाचविले आपल्या भारतभूमीला.
संकटे सारी स्वतःची झेलुनी,
स्वतःच्या तनाच्या चिंधड्या होऊनी,
जीवन आपुले त्यागले या कर्मभूमीला
मनी ध्यानी नसतांना,
अचानक आलेला वार शत्रुचा झेलुनी,
कवटाळले ज्या देशवीरांनी मृत्युला .
सदैव असैन प्रणाम माझा.

---

## शुभेच्छा संदेश :

१) स्वातंत्र्य मिळवणे सोपे काम नाही. पण त्याशिवाय जगणे कठीण आहे. म्हणून आपले पहिले कर्तव्य कोणत्याही किंमतीवर स्वातंत्र्यप्राप्ती करणे - राष्ट्रपिता महात्मा गांधी.

२) जन्मभूमी स्तव धाव घेतली, सोडुनी आपले माता पिता आयुष्याची होळी केली,
स्वतःच रचली आपली चिता
देशासाठी शहीद होऊन, स्वतंत्र केली भारत माता
शूर-वीरांच्या पराक्रमाची, चला गाऊया गौरव गाथा.

३) स्वातंत्र्य वीरांना करूया शत शत प्रणाम,
त्यांच्या निस्वार्थ त्यागानेच भारत बनला महान...
स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

जय हिंद

जय महाराष्ट्र